MHYA150005182021

| | |
|---|---|
| दावा दाखल तारीखः | २१/०६/२०२१. |
| दावा नोंदणी तारीखः | २१/०६/२०२१. |
| निकाल तारीखः | ३०/०३/२०२६. |

| | | | |
|---|---|---|---|
| कालावधीः | ०४ | ०९ | ०९ |
| | वर्षे | महिना | दिवस |

**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेर, जि. यवतमाळ,**

**यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री. जी. सी. फुलझळके)**

नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२१. निशाणी क्र.४०/अ.

**कृषी उत्पन्न बाजार समिती नेर तर्फे सचिव,** )
**विलास रामदास मालगे,** )
वय – ३९ वर्षे, व्यवसाय – नोकरी, )
रा. नेर, ता. नेर, जि. यवतमाळ. ) .. **वादी**

**विरुध्द**

**शिवकुमार हिरालाल ब्याहुत,** )
वय – ४४ वर्षे, व्यवसाय – व्यापार, )
रा. चांदणी चौक, नेर, )
ता. नेर, जि. यवतमाळ. ) .. **प्रतिवादी**

---

प्रतिनिधित्व –

**वादीतर्फे विद्वान विधीज्ञ – श्री. आर. ए. जुनगरे**

**प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ – श्री. एल. आर. मिर्झा**

---

## न्यायनिर्णय
## (दिनांक ३०/०३/२०२६ रोजी पारित.)

प्रस्तुतचा दावा बाजार फी रक्कम रु.४,७१,०६२/- ही १०% वार्षिक व्याजासह वसुल होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**वादी यांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे** –

२. वादी ही कृषी उत्पन्न बाजार समिती असुन शेतक-यांच्या हिताकरीता काम करते. तसेच व्यापारी व अडते यांचा शेतक-याशी समन्वय साधन्याचे सुद्धा काम करते. बाजार समितीमध्ये परवानाधारक व्यापारी यांना शेतक-यांचा शेतमाल बाजार समितीच्या आवारामध्ये खरेदी करण्याकरीता बाजार समिती व्यापा-यांना सर्व सुविधा पुरवितात. त्या करीता बाजार शुल्क म्हणुन व्यापा-यांकडुन काही रक्कम घेतल्या जाते. प्रतिवादी हे सुद्धा कृषी उत्पन्न बाजार समिती नेर येथे परवाना धारक व्यापारी म्हणुन असतांना त्यांच्याकडे बाजार समितीचे रु.४,७१,०६२/- बाजार फी चे थकीत असल्याने बाजार समितीने प्रतिवादी यांना वारंवार वरील रकमेची मागणी केली असता प्रतिवादी यांनी त्यांच्या यवतमाळ अर्बन कॉप. बँक लि. शाखा नेर येथील खाते क्रमांक १७०/५६ चा दिनांक २३.०७.२०२० रोजी धनादेश क्र.००३६५३ हा रु.४,७१,०६२/- करीता वादी यांना दिनांक २३.०७.२०२० रोजीचा दिला. तसेच सदर धनादेश वठविण्यास टाकु नका धनादेश तारखेला रक्कम देतो असे सांगितले. परंतु, सदर रक्कम वेळेत प्रतिवादी यांनी आणुन न दिल्यामुळे वादी यांनी सदर धनादेश वठविण्याकरीता त्यांच्या नेर येथील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा नेर येथे त्यांचे खाते क्र.००६४११०२०१४४३९ या

खात्यामध्ये टाकला असता तो अनादरीत झाला. त्यानंतर प्रतिवादी यांनी वादीला नमुद रक्कम ८ ते १० दिवसामध्ये परत करतो असे सांगितले. परंतु, प्रतिवादी यांनी दिलेल्या वेळेमध्ये रक्कम आणुन दिलेली नाही.

३. वादी पुढे नमुद करतात की, वादी यांनी दिनांक २२.१२.२०२० रोजी वकीलामार्फत नोटीस प्रतिवादीला पाठविली, सदरची नोटीस ही दिनांक ०६.०१.२०२१ रोजी प्रतिवादीला मिळाली. परंतु प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम आणुन दिलेली नाही व नोटीसला उत्तर देखील दिले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव सदरचा दावा दाखल करावा लागत आहे. सदरचा दावा मंजुर करण्यात यावा अशी वादी यांनी विनंती केली.

**कैफियत** –

४. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१३ वर त्यांचे म्हणणे सादर करुन दाव्यास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी कैफीयतीमध्ये नमुद केले की, वादी यांनी त्यांच्याविरुद्ध मोघम स्वरुपाचा आणि बनावटी दावा दाखल केला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार तथाकथीत व्यवहारा संदर्भाने कोणत्याही प्रकारचा तपशील दिला नाही. परंतु बाजार फीजच्या नावाखाली वादी यांनी दाखल केलेल्या दाव्या संदर्भाने गणना दिली नाही. तसेच वादी यांच्या म्हणण्यानुसार जर रु.४,७१,०६२/– थकीत आहे तर हे पैसे किती वर्षाचे, कोणत्या वर्षापासुन आणि किती वर्षापर्यंत थकीत आहे या बद्दल म्हटले नाही. तसेच बाजार फीस आकारण्याचा मापदंड काय आहे या बद्दल कोठेही उल्लेख दाव्यामध्ये केला नाही. तसेच त्याबद्दलचे निकष काय आहे याचा सुद्धा उहापोह केला नाही.

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफीयतीमध्ये पुढे नमुद केले की, सन २०१९ पासुन २०२० पर्यंत बाजार समितीमध्ये त्यांच्या नावाने व्यापाराचा परवाना होता. परंतु याच कालावधीमध्ये प्रतिवादी यांचा परवाणा हा वादी यांनी रद्द केला आहे. त्यासंदर्भाने वादी यांनी प्रतिवादी यांना दिनांक १०.०७.२०२० रोजी आणि दिनांक १२.०८.२०२० रोजी नोटीस देऊन त्यांच्याविरुद्ध थकीत असलेले रु.५०,८८०/– द्यावे असे म्हटले आहे, सदरची नोटीस दाव्यामध्ये दाखल केली आहे. प्रतिवादी यांनी पुढे नमुद केले की, त्यांच्याविरुद्ध वादी यांचे रु.४,७१,०६२/– इतकी फीस थकीत असती तर त्यांनी त्याच वेळी प्रतिवादी यांना वरील रकमेची मागणी केली असती. तसेच वादी यांनी प्रतिवादी यांना रु.५०,८८०/– रुपयाची मागणी केली ही गोष्ट वादी यांनी दाव्यामध्ये लपवून ठेवली आहे.

६. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफीयतीमध्ये पुढे नमुद केले की, वादी हे कोणत्याही व्यापाराला परवाना देतात त्यावेळी सुरक्षा म्हणुन एक हैसियत प्रमाणपत्र आणि एक कोरा धनादेश घेतल्या जाते. सन २०१९ मध्ये एका वर्षासाठी दिल्या गेलेल्या परवाणा देताना वादी यांनी प्रतिवादी कडुन एक कोरा धनादेश घेतला होता आणि सदर को–या धनादेशावर वादी यांनी चुकीची रक्कम टाकुन त्यांच्याविरुद्ध खोटा दावा दाखल केला आहे. सन २०२० मध्ये राजकीय वैमनस्यामुळे प्रतिवादी यांचा परवाना रद्द करण्यात आला. प्रतिवादी यांनी पुढे नमुद केले की, त्यांनी वादी यांना कोरा धनादेश परत मागितला असता कोरा धनादेश देण्यास टाळाटाळ केली. वादी यांनी को–या धनादेशाचा गैरफायदा घेऊन खोटा आणि बनावटी दावा दाखल केला

आहे. सबब दावा खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली.

७. माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी निशाणी क्र.१४ खाली इंग्रजी भाषेत वाद मुद्दे निश्चित केले आहेत, त्याचा मराठी अनुवाद व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी कृषी उत्पन्न बाजार समिती असे सिद्ध करते काय की, प्रतिवादी हा बाजार फी रक्कम रु.४,७१,०६२/- वादी यांना देणे लागतो ? जर होय तर व्याज किती ? | नाही. |
| २. | इतर मागण्या मंजुर होण्यास वादी पात्र आहे काय ? | नाही. |
| ३. | आदेश आणि हुकुमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**वादी यांचा पुरावाः-**

८. वादी यांनी दाव्याच्या कथनांच्या समर्थनार्थ खालील तोंडी पुरावा सादर केला.

| अनु. क्र. | साक्षीदारांचे नाव | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | निलेश शंकरराव मंदिलकर. | २८. |

९. वादी यांनी दाव्यातील कथनांच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| **अनु. क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | धनादेशाची प्रामाणित प्रत. | १६. |
| २. | प्रतिवादी यांना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत. | १७. |
| ३. | प्रतिवादी यांना पाठविलेल्या नोटीसची पावती | १८. |
| ४. | प्रतिवादी यांना नोटीस मिळाल्याबाबतचे पोहोचपत्रक | १९. |
| ५. | धनादेशाची मुळ प्रत. | २९ |
| ६. | वादी यांनी निलेश मंदिलकर यांच्या लाभामध्ये करुन दिलेल्या अधिकारपत्राची प्रामाणित प्रत. | ३० |

१०. वादी यांनी निशाणी क्र.३६ वरील पुरसिसनुसार त्यांचा पुरावा बंद केला.

११. प्रतिवादी यांनी बचावाच्या समर्थनार्थ खालील तोंडी पुरावा सादर केला.

| **अनु. क्र.** | **साक्षीदारांचे नाव** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | शिवकुमार हिरालाल ब्याहुत. | ३७ |

१२. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.३९ वरील पुरसिसनुसार पुरावा बंद केला.

१३. प्रतिवादी यांनी त्यांच्या बचावाच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री

पुरावा सादर केला नाही.

१४. वादी यांच्यातर्फे विद्वान वकील श्री. आर. ए. जुनगरे व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान वकील श्री. एल. आर. मिर्झा यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ व २ बाबत** :–

१५. दावा सिद्धतेचा प्रारंभिक भार वादीवर असतो. वादीने दाव्यात मांडलेले तथ्य आवश्यक पुराव्याच्या अनुशंगाने सिद्ध करणे आवश्यक आहे, जर वादी आवश्यक तो पुरावा सादर करण्यास अयशस्वी ठरला तर प्रतिवादीने कोणतेही पुरावे सादर केले नसले तरीही, वादीचा दावा अयशस्वी होतो. दावा सिद्ध करण्याची सुरुवातीची संपुर्ण जबाबदारी प्रतिवादीवर कधीही हस्तांतरित होत नाही.

१६. वादी यांनी साक्षीदार म्हणुन निलेश मंदिलकर यांच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.२८ वर सादर केले आहे. शपथपत्रातील कथने वर नमुद केलेल्या दाव्यातील कथनांप्रमाणे असल्याने सदर कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी ते संपुर्ण कथन पुन्हा येथे सविस्तरपणे नमुद करीत नाही. वादी यांनी पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले की, वादी ही कृषी उत्पन्न बाजार समिती असुन शेतक–यांच्या हिताकरीता काम करते. तसेच व्यापारी व अडते यांचा शेतक–याशी समन्वय साधन्याचे सुद्धा काम करते. बाजार समितीमध्ये परवानाधारक व्यापारी यांना शेतक–यांचा शेतमाल बाजार समितीच्या आवारामध्ये खरेदी करण्याकरीता बाजार समिती व्यापा–यांना सर्व सुविधा पुरविते. त्या करीता बाजार शुल्क म्हणुन व्यापा–यांकडुन काही रक्कम घेतल्या जाते. प्रतिवादी हे सुद्धा कृषी उत्पन्न बाजार समिती नेर येथे परवाना धारक व्यापारी म्हणुन असतांना त्यांच्याकडे बाजार समितीचे

रु.४,७१,०६२/– बाजार फी थकीत असल्याने बाजार समितीने प्रतिवादी यांना वारंवार वरील रकमेची मागणी केली असता प्रतिवादी यांनी त्यांच्या यवतमाळ अर्बन कॉप. बँक लि. शाखा नेर येथील खाते क्रमांक १७०/५६ चा दिनांक २३.०७.२०२० रोजी धनादेश क्र.००३६५३ हा रु.४,७१,०६२/– करीता वादी यांना दिला. तसेच सदर धनादेश वठविण्यास टाकु नका धनादेश तारखेला रक्कम देतो असे सांगितले. परंतु, सदर रक्कम वेळेत प्रतिवादी यांनी आणुन न दिल्यामुळे वादी यांनी सदर धनादेश वठविण्याकरीता त्यांच्या नेर येथील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा नेर येथे त्यांचे खाते क्र.००६४११०२०१४४३९ या खात्यामध्ये टाकला असता तो अनादरीत झाला. त्यानंतर प्रतिवादी यांनी वादी यांना नमुद रक्कम ८ ते १० दिवसामध्ये परत करतो असे सांगितले. परंतु, प्रतिवादी यांनी दिलेल्या वेळेमध्ये रक्कम आणुन दिलेली नाही.

१७. वादी यांनी पुराव्याच्या शपथपत्रात पुढे नमुद केले की, वादी यांनी दिनांक २२.१२.२०२० रोजी वकीलामार्फत नोटीस प्रतिवादी यांना पाठविण्यात आली, सदरची नोटीस ही दिनांक ०६.०१.२०२१ रोजी प्रतिवादी यांना मिळाली. परंतु प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम आणुन दिलेली नाही व नोटीसला उत्तर देखील दिले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव सदरचा दावा दाखल केल्याचे सदर साक्षीदार यांनी पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले.

१८. प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात वादी यांचे साक्षीदार क्र.१ निलेश मंदिलकर यांनी नमुद केले की, सन २०२३ पुर्वी ते सचिव नव्हते. दरवर्षीच्या नोंदीच्या व्यवहाराचे रजिस्टर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या

कार्यालयात असते. नोंदीच्या व्यवहाराचे रजिस्टर सचिवांच्या ताब्यात असते. सचिव हा सदर रजिस्टरचा ताबेदार असतो. सन २०१९ ते २०२२ च्या दरम्यान सचिव कोण होते हे साक्षीदार यांना माहित नसल्याचे त्यांनी नमुद केले.

१९. प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात वादी यांचे साक्षीदार क्र.१ निलेश मंदिलकर यांनी पुढे नमुद केले की, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दरवर्षी येणा–या कास्तकारांच्या मालाचे ऑडीट होत असते. तसेच पुढे त्यांनी नमुद केले की, सदर ऑडीटमध्ये कास्तकारांनी किती माल आणला होता व अडत्यांनी किती माल घेतला याबाबत नमुद असते. तसेच व्यापा–यांनी किती माल उधारीवर घेतला याबाबत देखील ऑडीटमध्ये नमुद असते.

२०. प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात वादी यांचे साक्षीदार क्र.१ निलेश मंदिलकर यांनी पुढे नमुद केले की, प्रतिवादीकडे उधारी असल्याचे दस्त त्यांनी सोबत आणला नाही. सन २०१९ ते सन २०२१ या कालावधीच्या ऑडीटच्या अहवालाचा दस्त त्यांनी सोबत आणला नसल्याचे नमुद केले. प्रतिवादी यांना कोणत्या वर्षी परवाणा देण्यात आला होता हे त्यांना आठवत नसल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले. तसेच प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात वादी यांचे साक्षीदार क्र.१ निलेश मंदिलकर यांनी पुढे नमुद केले की, हे त्यांना आठवत नाही की, प्रतिवादी यांनी सन २०१९ ते सन २०२१ सालापर्यंत कोणत्या वर्षी कोणत्या कास्तकाराकडुन किती माल घेतला होता. सन २०१९ ते सन २०२० या कालावधीमध्ये प्रतिवादी यांनी घेतलेल्या मालाबाबतचा दस्त त्यांनी सादर केला नाही. प्रतिवादी यांनी नेमका किती रुपयांचा माल घेतला होता

त्याबाबतच्या रकमेचा उल्लेख दाव्यात नाही. प्रतिवादी यांच्याकडुन रक्कम रु.४,७१,०६२/– कोणत्या मालाकरीता थकीत आहे याबाबतचा उल्लेख दाव्यात नसल्याचे वादी यांच्या साक्षीदाराने उलटतपासात नमुद केले. तसेच रक्कम रु.४,७१,०६२/– प्रतिवादी यांच्याकडे थकीत असल्याबाबतचा दस्त दाव्यात सादर केला नाही. प्रतिवादी यांच्याकडुन किती टक्के बाजारमुल्य आकारण्यात आले याबाबत दाव्यात नमुद नाही.

२१. प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात वादी यांचे साक्षीदार क्र.१ निलेश मंदिलकर यांनी पुढे नमुद केले की, निशाणी क्र.३६ व निशाणी क्र.३७ वरील नोटीसा ह्या प्रतिवादी यांच्याकडुन थकीत रक्कम रु.५०,८८०/– वसुल करण्याकरीता देण्यात आल्या होत्या. तसेच सदर साक्षीदार यांनी नमुद केले की, प्रस्तुतचा दावा हा सन २०२० पुर्वी थकीत असलेल्या रकमेकरीता दाखल करण्यात आलेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत व्यापार करण्यासाठी व्यापा–यांना परवाणा देतांना करार केला जातो, व्यापा–यांना परवाणा देतांना जामीनदार घेतल्या जातो. प्रतिवादी यांच्यातर्फे करण्यात आलेल्या इतर सुचना वादी यांचे साक्षीदार यांनी नाकारल्या.

२२. प्रतिवादी यांनी त्यांच्यातर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन प्रतिवादी शिवकुमार हिरालाल ब्याहुत यांच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.३७ वर सादर केले आहे. सदर पुराव्यातील शपथपत्र व कैफियतीमधील कथन सारख्या स्वरुपाचे असल्यामुळे सदरचे संपुर्ण कथन पुन्हा सविस्तरपणे नमुद करण्यात येत नाही. सदर साक्षीदार क्र.१ यांनी पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले की, वादी यांनी त्यांच्याविरुद्ध मोघम

स्वरुपाचा आणि बनावटी दावा दाखल केला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार तथाकथीत व्यवहारा संदर्भाने कोणत्याही प्रकारचा तपशील दिला नाही. परंतु बाजार फीजच्या नावाखाली वादी यांनी दाखल केलेल्या दाव्या संदर्भाने गणना दिली नाही. तसेच वादी यांच्या म्हणण्यानुसार जर रु.४,७१,०६२/– थकीत आहे तर हे पैसे किती वर्षाचे, कोणत्या वर्षापासुन आणि किती वर्षापर्यंत थकीत आहे या बद्दल नमुद केले नाही. तसेच बाजार फीस आकारण्याचा मापदंड काय आहे या बद्दल दाव्यामध्ये कोठेही उल्लेख केला नाही. तसेच त्याबद्दलचे निकष काय आहे याचा सुद्धा उहापोह केला नाही.

२३. प्रतिवादी यांनी पुराव्याच्या शपथपत्रात पुढे नमुद केले की, सन २०१९ पासुन सन २०२० पर्यंत बाजार समितीमध्ये त्यांच्या नावाने व्यापाराचा परवाना होता. परंतु याच कालावधीमध्ये प्रतिवादी यांचा परवाणा हा वादी यांनी रद्द केला आहे. त्यासंदर्भाने वादी यांनी प्रतिवादी यांना दिनांक १०.०७.२०२० रोजी आणि दिनांक १२.०८.२०२० रोजी नोटीस देऊन त्यांच्याविरुद्ध थकीत असलेले रु.५०,८८०/– द्यावे असे म्हटले आहे, सदरची नोटीस दाव्यामध्ये दाखल केली आहे. प्रतिवादी यांनी पुढे नमुद केले की, त्यांच्याविरुद्ध वादी यांचे रु.४,७१,०६२/– इतकी फीस थकीत असती तर त्यांनी त्याच वेळी प्रतिवादी यांना वरील रकमेची मागणी केली असती. तसेच वादी यांनी प्रतिवादी यांना रु.५०,८८०/– रुपयाची मागणी केली ही गोष्ट वादी यांनी दाव्यामध्ये लपवून ठेवली आहे.

२४. प्रतिवादी यांनी पुराव्याच्या शपथपत्रात पुढे नमुद केले की, वादी हे कोणत्याही व्यापाराला परवाना देतात त्यावेळी सुरक्षा म्हणुन एक हैसियत प्रमाणपत्र आणि एक कोरा धनादेश घेतल्या जाते. सन २०१९ मध्ये एका वर्षासाठी दिल्या गेलेल्या परवाणा देताना वादी यांनी प्रतिवादी कडुन एक कोरा धनादेश घेतला होता आणि सदर को–या धनादेशावर वादी यांनी चुकीची रक्कम टाकुन त्यांच्याविरुद्ध खोटा दावा दाखल केला आहे. सन २०२० मध्ये राजकीय वैमनस्यामुळे प्रतिवादी यांचा परवाना रद्द करण्यात आला. प्रतिवादी यांनी पुढे पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले की, त्यांनी वादी यांना कोरा धनादेश परत मागितला असता कोरा धनादेश देण्यास टाळाटाळ केली. वादी यांनी को–या धनादेशाचा गैरफायदा घेऊन खोटा आणि बनावटी दावा दाखल केला आहे.

२५. वादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात प्रतिवादी यांनी नमुद केले की, ते कृषी उत्पन्न बाजार समिती नेर यांचे परवाणाधारक व्यापारी आहेत. कृषी उत्पन्न बाजार समीती ही शेतक–यांचा कच्चा माल घेऊन व्यापा–यांना उपलब्ध करुन देते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समीती शेतीच्या मालाबाबत सुविधा पुरवते. वादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात प्रतिवादी यांनी नमुद केले की, सोयाबीन, कापुस, तुर, चना, मुग, गहू, उडीद हे कड धान्य शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समीतीमध्ये प्रामुख्याने आनतात. सर्व शेतक–यांचा शेतमाल हा सामान्यतः हजार क्वींटलच्या वर असतो. प्रत्येक परवानाधारक व्यापारी यांना कृषी उत्पन्न बाजार समिती यांना सुपरवीजन फी व बाजार फी द्यावी लागते.

२६. वादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात प्रतिवादी यांनी नमुद केले की, ते चेकबुक वापरतात. धनादेश दिल्यानंतरची जबाबदारीबाबत त्यांना माहिती आहे. निशाणी क्र.३९ वरील धनादेश त्यांनी सही करुन दिला होता. कृषी उत्पन्न बाजार समिती नेर यांनी नोटीस पाठविल्याचे व सदरची नोटीस रक्कम रु.४,७१,०६२/– रकमेच्या वसुलीसाठी असल्याबाबत सदर साक्षीदार यांनी नमुद केले. तसेच सदर साक्षीदार यांनी नमुद केले की, निशाणी क्र.३६ व ३७ वरील पत्र त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी त्यांना दिलेले आहे. सदर पत्रामधील विषय हा दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२० या एका वर्षाच्या बाजार फी व सुपरविजन फी च्या भरणेबाबत असल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले. तसेच वादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात प्रतिवादी यांनी नमुद केले की, त्यांना २० वर्षांचा व्यापारी व्यवसायाचा अनुभव आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती नेर विरुद्ध धनादेशाबाबत पोलिस तक्रार व इतर कार्यवाही दाखल केली नसल्याचे सदर साक्षीदार यांनी उलटतपासात नमुद केले.

२७. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी हे वादी यांचे परवाणा धारक व्यापारी आहेत. वादी कृषी उत्पन्न बाजार समिती व्यापा–यांना काही सुविधा पुरविते त्याकरीता बाजार शुल्क म्हणुन व्यापा–यांकडुन काही रक्कम घेतल्या जाते. प्रतिवादी यांच्याकडे रक्कम रु.४,७१,०६२/– एवढी रक्कम थकीत आहे. त्याकरीता प्रतिवादी यांनी धनादेश क्र.००३६५३ हा रक्कम रु.४,७१,०६२/– च्या थकबाकीकरीता वादी यांच्या लाभामध्ये दिला होता. सदर धनादेश वठविण्यासाठी टाकला असता प्रतिवादी यांच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे धनादेश अनादरीत झाला. त्यानंतर प्रतिवादी यांनी वादी यांच्याकडे येऊन रक्कम परत करतो असे वेळोवेळी

सांगितले परंतु, कोणतीही रक्कम प्रतिवादी यांनी दिली नाही.

२८. वादी यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, पराक्रम्य अधिनियम कलम १३९ मधील तरतुदीनुसार असे गृहीतक आहे की, धनादेश हा कायदेशीर रक्कम फेडण्यासाठी दिल्या जातो. अभिलेखावरील निशाणी २९ वरील धनादेशावरुन सिद्ध होते की, प्रतिवादी यांच्याकडे असलेली थकीत रक्कम रु.४,७१,०६२/– देण्याकरीता प्रतिवादी यांनी वादी यांच्या लाभामध्ये धनादेश दिलेला आहे म्हणुन दावा मंजुर करण्यात येऊन प्रतिवादी यांना वादी यांची थकीत रक्कम रु.४,७१,०६२/– देण्याबाबत आदेशित करावे अशी विनंती केली आहे.

२९. प्रतिवादी यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, पराक्रम्य अधिनियम कलम १३९ मधील तरतुदीनुसार असलेले गृहीतक खंडीत केले जाऊ शकते. वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडे कोणत्या कालावधीमध्ये, कोणत्या सुविधेकरीता, कशाप्रकारे रक्कम थकीत आहे याबाबत दर्शविणारा कोणताही पुरावा सादर केला नाही. तसेच प्रतिवादी यांनी सुरक्षिततेसाठी दिलेल्या धनादेशाचा वादी यांनी गैरवापर केला आहे, प्रतिवादी कोणतीही रक्कम देणे लागत नाही. म्हणुन दावा नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी यांच्या वकीलांनी केली आहे.

३०. येथे सर्वप्रथम नमुद करण्यात येते की, प्रतिवादी यांच्याकडे कोणत्या मालाबाबत व किती रुपयांच्या मालाबाबत वसुली बाकी आहे याबाबत दाव्यात तसेच वादी यांच्या पुराव्यात काहीही नमुद नाही. वादी यांचे साक्षीदार यांनी नमुद केले की, कृषी उत्पन्न बाजार समिती नेर येथे दरवर्षी कास्तकाराच्या मालाचे ऑडीट होत असते. सदर ऑडीटमध्ये कास्तकारांनी किती माल आणला होता व अडत्यांनी

किती माल घेतला होता याबाबत नमुद असते. परंतु वादी यांच्यातर्फे ऑडीटचा कोणताही दस्त तसेच प्रतिवादी यांच्याकडे रक्कम बाकी असल्याबाबत सुपरविजन फी चा दस्त व बाजार फी चा दस्त अभिलेखावर सादर करण्यात आला नाही. तसेच सदरचा दस्त सादर न करण्यास कोणतेही योग्य व रास्त कारण अभिलेखावर सादर नाही.

३१. येथे ही बाब देखील नमुद करणे अत्यंत महत्वाचे आहे की, निशाणी क्र.३६ व निशाणी क्र.३७ वरील पत्र हे वादी यांच्यातर्फे प्रतिवादी यांना दिनांक १०.०७.२०२० व दिनांक १२.०८.२०२० रोजी देण्यात आल्याचे दिसुन येते. सदर पत्र हे वादी यांच्यातर्फे प्रतिवादी यांना देण्यात आल्याबाबत वादी यांचे साक्षीदार यांनी प्रतिवादी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात नमुद केले आहे. निशाणी क्र.१७ वरील सुचनापत्र वादी यांनी दावा दाखल करण्यापुर्वी दिनांक २२.१२.२०२० रोजी प्रतिवादी यांना पाठविल्याचे दिसुन येते व सदर पत्रामध्ये प्रतिवादी यांच्याकडे मार्केट फी रु.४,७१,०६२/– थकीत असल्याबाबत नमुद केले आहे. निशाणी क्र.३६ वरील पत्राची पाहणी केली असता दिसुन येते की, सदरचे पत्र हे दिनांक १०.०७.२०२० रोजीचे आहे. सदरचे पत्र प्रतिवादी यांना बाजार फी व सुपरविजन फी चा भरणा करण्याबाबत वादी यांनी पाठविले आहे. सदरच्या पत्रामध्ये बाजार फी व सुपरविजन फी एकुण रु.५०,८८०/– एवढी असल्याचे नमुद आहे. निशाणी क्र.३७ वरील पत्राची पाहणी केली असता दिसुन येते की, सदरचे पत्र हे दिनांक १२.०८.२०२० रोजीचे आहे. सदरच्या पत्रामध्ये प्रतिवादी यांना बाजार फी व सुपरविजन फी चा भरणा करण्याबाबत नमुद करण्यात आले आहे. सदरच्या पत्रामध्ये बाजार फी व सुपरविजन फी एकुण रु.५०,८८०/– एवढी असल्याचे नमुद

आहे. निशाणी क्र.३६ व निशाणी क्र.३७ वरील पत्रावरुन दिसुन येते की, सन २०२० मध्ये सदरचे पत्र वादी यांनी प्रतिवादी यांना दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत खरेदी केलेल्या शेतमालावरील बाजार फी व सुपरविजन फी रक्कम रु.५०,८८०/- भरणा करणेबाबत पाठविलेले आहे. सदर पत्रांवरुन स्पष्ट होते की, दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२० या कालावधीमध्ये खरेदी केलेल्या शेतमालावरील बाजार फी व सुपरविजन फी रक्कम रु.५०,८८०/- एवढी प्रतिवादी यांच्याकडे थकीत असल्याचे वादी यांचे म्हणणे होते.

३२. निशाणी क्र.१७ वरील नोटीस ही दिनांक २२.१२.२०२० रोजीची असुन त्यामध्ये प्रतिवादी यांच्याकडे रक्कम रु.४,७१,०६२/- एवढी मार्केट फी थकीत असल्याचे नमुद आहे. निशाणी क्र.३७ वरील पत्र हे दिनांक १२.०८.२०२० रोजीचे असुन सदर पत्रामध्ये दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत खरेदी केलेल्या शेतमालावरील बाजार फी व सुपरविजन फी रक्कम रु.५०,८८०/- प्रतिवादी यांनी भरणा करणेबाबत नमुद आहे. परंतु, निशाणी क्र.१७ वरील दिनांक २२.१२.२०२० मधील नोटीसमध्ये मार्केट फी रु.४,७१,०६२/- एवढी प्रतिवादी यांच्याकडे थकीत असल्याबाबत नमुद आहे. निशाणी क्र.३७ वरील पत्र हे दिनांक १२.०८.२०२० रोजीचे असुन त्या पत्रामध्ये रक्कम रु.५०,८८०/- एवढी बाजार फी व सुपरविजन फी प्रतिवादी यांच्याकडे प्रलंबित असल्याचे नमुद आहे. त्यानंतर ४ महिने १० दिवस नंतर प्रतिवादी यांच्याकडे मार्केट फी रु.४,७१,०६२/- एवढी प्रलंबित असल्याबाबत वादी यांनी प्रतिवादी यांना सुचनापत्र दिल्याचे दिसुन येते. नेमके निशाणी क्र.३७ वरील पत्र

दिल्यानंतर ४ महिने १० दिवस नंतर प्रतिवादी यांच्याकडे रक्कम रु.४,७१,०६२/– कशाच्या आधारावर प्रलंबित आहे याबाबत दाव्यात तसेच वादी यांच्या साक्षीदारांच्या पुराव्यात काहीही नमुद नाही.

३३. येथे ही बाब नमुद करणे अत्यंत महत्वाचे आहे की, प्रतिवादी यांच्याकडे कोणत्या कालावधीकरीता बाजार फी व सुपरविजन फी थकीत आहे त्या कालावधीचा उल्लेख दाव्यात व वादी यांचे साक्षीदार यांच्या निशाणी क्र.२८ वरील पुराव्याच्या शपथपत्रात नमुद नाही. प्रतिवादी कोणत्या कालावधी करीता बाजार फी व सुपरविजन फी देणे आहे याबाबत दाव्यात व पुराव्याच्या शपथपत्रात नमुद न करण्याचे कोणतेही योग्य व रास्त कारण सादर नाही. तसेच प्रतिवादी यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत कोणत्या सुविधा, कोणत्या कालावधीमध्ये व कोणत्या स्वरुपात पुरविण्यात आल्या होत्या याबाबत दाव्यात व वादी यांचे साक्षीदार यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात काहीही नमुद नाही. तसेच प्रतिवादी यांनी कास्तकारांकडुन किती व कधी शेतमाल घेतला होता व शेतमाल कोणत्या स्वरुपाचा होता याबाबत देखील दाव्यात व वादी यांचे साक्षीदार यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात काहीही नमुद नाही.

३४. वादी यांच्या साक्षीदारांनी नमुद केले की, वादी कृषी उत्पन्न बाजार समिती नेर त्यांच्याकडे येणा–या कास्तकारांच्या शेतमालाचे ऑडीट करत असते परंतु, ऑडीटचा कोणताही दस्त अभिलेखावर सादर नाही. वादी यांच्या साक्षीदारांनी नमुद केले की, प्रस्तुतचा दावा हा सन २०२० पुर्वी थकीत असलेल्या रकमेकरीता दाखल केलेला आहे, वर नमुद केल्याप्रमाणे सन २०२० पुर्वीच्या कोणत्या

कालावधीदरम्यान बाजार फी व सुपरविजन फी प्रतिवादी यांच्याकडे थकीत आहे याबाबत कोणताही उल्लेख दाव्यात व पुराव्याच्या शपथपत्रात नाही.

३५. येथे हे नमुद करणे महत्वाचे आहे की, वादी यांच्यातर्फे प्रतिवादी यांच्या नावे कोणतीही रक्कम थकीत असल्याचे दर्शविणारा साधा दस्त देखील अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. वादी कृषी उत्पन्न बाजार समिती ही शासकिय संस्था असल्याने वादी संस्थेवर सर्व व्यवहारांची व देयकांची अचुक व नियमित नोंद ठेवणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र सदर प्रकरणात अशी कोणतीही नोंद सादर करण्यात आलेली नाही. प्रतिवादी यांनी घेतलेल्या मालाबाबत तसेच कास्तकारांनी प्रतिवादी यांना दिलेल्या मालाबाबत कोणताही दस्त अभिलेखावर सादर नाही, ऑडीट रिपोर्टचा दस्त अभिलेखावर सादर नाही. प्रतिवादी यांच्याकडे रक्कम थकीत असल्याचे दर्शविण्याकरीता वादी यांनी त्यांच्या कार्यालयाची पावती अथवा संबंधित रजिस्टरचा दस्त देखील अभिलेखावर सादर केला नाही. तसेच अभिलेखावरील निशाणी क्र.१६ वरील धनादेशाच्या प्रतिचे अवलोकन केले असता दिसुन येते की, सदर धनादेश हा दिनांक २३.०७.२०२० रोजीचा असुन त्यामध्ये सेल्फ व त्यापुढे ए.पी.एम.सी. नेर असे नमुद आहे. सदरचा धनादेश हा थकीत असलेल्या रकमेकरीता दिल्याबाबत कुठेही नमुद नाही.

३६. पराक्रम्य अधिनियम कलम १३९ मधील तरतुदीनुसार असलेले गृहीतक खंडीत केले जाऊ शकते. सदरचे गृहीतक खंडीत करण्यासाठी संशयाच्या पलीकडे जाऊन सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफीयत व पुराव्यावरुन सिद्ध होते की, प्रतिवादी हा वादी यांचा परवाणा धारक

व्यापारी आहे. परंतु, अभिलेखावर वादी यांच्यातर्फे प्रतिवादी हा त्याला पुरविलेल्या सुविधेबाबत रक्कम रु.४,७१,०६२/– देणे लागतो याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तसेच वादी यांच्या साक्षीदारांच्या पुराव्यात देखील सदरची रक्कम प्रतिवादी कोणत्या कालावधीकरीता व कोणत्या सुविधेकरीता देणे लागतो याबाबत स्पष्टपणे नमुद नाही. प्रतिवादी यांनी नमुद केले की, व्यापा–यांना परवाणा दिला जातो तेव्हा त्यांच्याकडुन सुरक्षिततेसाठी कोरा धनादेश घेतल्या जातो. तसेच निशाणी क्र.२९ वरील धनादेशामध्ये इंग्रजी अक्षरामध्ये self त्यापुढे A.P.M.C. Ner असे नमुद आहे. यामुळे प्रतिवादी यांनी धनादेश रक्कम रु.४,७१,०६२/– रुपयांच्या थकीत रकमेकरीता कृषी उत्पन्न बाजार समिती नेर यांना दिल्याबाबत संदेह निर्माण होतो. प्रतिवादी कशाप्रकारे, कोणत्या सुविधेसाठी व कोणत्या कालावधीकरीता थकीत रक्कम देणे लागतो याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर सादर नाही.

३७. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेता प्रतिवादी हा वादी यांनी पुरविलेल्या सुविधेबाबत रक्कम रु.४,७१,०६२/– देणे लागतो ही बाब पुराव्यानिशी वादी यांना सिद्ध करता आलेली नाही. तसेच अभिलेखावरील पुरावा व निशाणी क्र.२९ वरील धनादेशातील नमुद मजकुर विचारात घेता पराक्रम्य अधिनियमाचे कलम १३९ च्या तरतुदीनुसार असलेले गृहीतक वादी यांच्या बाजुने ग्राह्य धरता येणार नाही या निष्कर्षाला मी आलो आहे.

३८. वरिल सर्व बाबींचा व अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचा एकत्रित विचार करता वादी कृषी उत्पन्न बाजार समिती यांची प्रतिवादी यांच्याकडे

बाजार फी रक्कम रु.४,७१,०६२/– थकीत असल्याची बाब वादी यांना पुराव्यानिशी सिद्ध करता आली नाही. म्हणुन वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडुन बाजार फी रक्कम रु.४,७१,०६२/– वसुल करुन मिळण्याची केलेली मागणी मंजुर होण्यास पात्र नाही या निष्कर्षाला मी आलो आहे. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ बाबतः–**

३९. मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता दावा नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.३ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. दावा नामंजुर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.04.01 11:39:16 +0530

नेर, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ३०.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर,

ता. नेर, जि. यवतमाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. B. N. Nare (Grade-III) |
| Court | :- | Civil Judge Jr.Dn. Ner. |
| Date | :- | 30/03/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | :- | 01/04/2026 |
| Judgment uploaded on | :- | 01/04/2026 |